IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Impact Factor: 6.252

Volume 2, Issue 1, September 2022

# ग्रंथालयाची व ग्रंथपालाची आपत्ती / जोखीम व्यवस्थापनामध्ये भूमिका

**Sau. Snehal Sachin Kulkarni**

Librarian

Gokhale Education Society's Sir Dr. M.S.Gosavi College of Physiotherapy and Health Care Management, Nashik

**काही नियंत्रण करण्यायोग्य आहेत. आपत्ती याचा अर्थ अचानक उद्‌भवलेल्या घटना. अशा घटना की ज्या मालमत्तेचे किंवा जीवनाचे विनाश किंवा नुकसान करीत असतात.अश्या या आपत्त्या नैसर्गिकरीत्या किंवा मानवनिर्मित असू शकतात. अश्या या आपत्तींपासून झालेल्या नुकसानाची परतफेड कशी करायची किंवा त्यासाठी केले जाणारे व्यवस्थापन म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय.**

**आपत्ती व्यवस्थापनामुळे घटनेचे धोके, नुकसान हे टाळता येते. नैसर्गिक आपत्ती जसे की, भूकंप, सुनामी, पूर, दुष्काळ, जंगलांमुळे लागलेली भीषण आग यामुळे आपल्या आज बऱ्याचश्या परिसरांमध्ये नुकसान झालेले आहे. तर रस्ते तुटतात, पूल पडतात, मोठमोठ्या इमारती कोसळतात, कित्येक पक्षी व प्राणी मृत्युमुखी पडतात. थोडक्यात नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींमुळे जीवित हानी होते. त्यासोबत आर्थिक नुकसान सुद्धा होते. अश्या प्रकारे यापासून वाचविण्यासाठी व आपत्ती जीवन व आर्थिक हानीला रोखण्यासाठी एकमेव मार्ग म्हणजे आपत्ती व्यवस्थापन होय. ग्रंथालयांनाही पूर, भूकंप किंवा अन्य मानवनिर्मित आपत्तींना तोंड द्यावे लागते.**

**आजच्या काळातही ग्रंथालयांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. ग्रंथालयात असणारे वाचनसाहित्य, हस्तलिखिते, दुर्मिळ ग्रंथ, फर्निचर, यंत्रसामग्री, CD/DVD, हार्ड डिस्क, पेन ड्राईव इ. यांची जपवणूक करणे हे प्रत्येक ग्रंथालयाचे आद्य कर्तव्य आहे. त्यासाठी ग्रंथालयातील ग्रंथापालाने ग्रंथालयाचे संवर्धन करणे आवश्यक आहे. अश्या अनेक प्रकारच्या येणाऱ्या आपत्तींपासून वेळीच कोण-कोणत्या उपाययोजना केल्या जाऊ शकतात यावर हा एक दृष्टीक्षेप सदर लेखात समाविष्ट करण्यात आला आहे.**

**सामाजिक हानी होते. तसेच त्या समाजावर तिचे दूरगामी परिणाम होतात अश्या संकटाला आपत्ती म्हणतात.**

**आपत्तीची व्याख्या :**

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO 1999) केलेली आपत्तीची व्याख्या :- “A Disaster as any Occurrence that causes damage, destruction, ecological disruption, loss of Human life, Human Suffering, deterioration of Health & Wealth Services on a scale sufficient to warrant an extra ordinary response from outside the affected community or area”.

१) आपत्ती पूर्व व्यवस्थापन - यामध्ये प्रशिक्षण, जनजागृती उपक्रम, प्रात्यक्षिक व यंत्रणांचा सराव इ. गोष्टी समाविष्ट होतात.

२) विविध आपत्ती प्रतिसाद दलांशी संपर्क व समन्वय ठेवणे.

३)आपत्ती प्रसंगी व्यवस्थापनात - मदत कार्याचे नियोजन करून त्यामध्ये समन्वय राखणे.

४) आपत्ती नंतरचे व्यवस्थापनात -मदत कार्य नियंत्रित करणे व मदत आणि पुनर्वसन योजनेची योग्य अंमलबजावणी करणे इ.

**आपत्तीचे प्रकार :**

१) नैसर्गिक आपत्ती : a)भूकंप b)ज्वालामुखी c)पूर d)ढगफुटी e)प्रचंड वादळ

२) मानवनिर्मित आपत्ती : a)दहशतवाद b)जातीय दंगे c)युद्धे d)चोरी, गुन्हेगारी e)विषाणूचा प्रादुर्भाव f)अचानक मृत्यू किंवा आजारपण g)अपघात

३) तांत्रिक आपत्ती : a)विद्युत पुरवठा खंडित होणे b)संदेशवहन ठप्प होणे c)गॅस गळती d) यंत्रणेत बिघाड होणे.

**आपत्ती व्यवस्थापन:**

Prevention is better than cure हि गोष्ट सगळ्यांनाच मान्य आहेत. कोणताही अपघात घडण्याआधी तो घडू नये म्हणून घेतलेली खबरदारी. थोडक्यात सांगायचे तर आपत्तीपासून उद्भवणारी जीवित हानी, वित्त हानी व सामाजिक हानी अश्या सर्वच पातळीवरील दुष्परिणाम अभ्यासून शक्य तेवढ्या प्रमाणात होणारी हानी कमी करण्यासाठी योजले जाणारे विविध उपाय व योजना होय.

ग्रंथालयात सुद्धा अश्या अनेक प्रकारच्या आपत्ती येऊ शकतात. जसे विजेच्या वायरी, शोर्ट सर्किट, पाण्याचे पाईप, वाळवीचा प्रादुर्भाव, अतिवृष्टी, छत गळणे, भूकंप, वादळ इ. या सगळ्यांपासून ग्रंथालयाचे संरक्षण करण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन अतिशय महत्वाचे आहेत.

आवश्यक आपत्कालीन उपकरणे :

प्रत्येक ग्रंथालयाने आपत्कालीन साहित्य ठेवले पाहिजे त्यामध्ये पुढील उपकरणे असावीत- १) टॉर्च २) हेल्मेट ३) संरक्षणात्मक कापड ४) रबरी बूट व हातमोजे ५) फेस मास्क आणि गॉगल ६) प्रथमोपचार पेट्या ७) इलेक्ट्रिक एक्सटेनशन केबल ८) हाताने चालणारे पाण्याचे पंप ९) ओले व कोरडे व्हॅक्यूम क्लिनर १०) पोर्टबल टेबल व ट्रॉली ११) स्क्रूडायवर व हातोडा, पांढरा ब्लॉटिंग पेपर, स्पंज किचन टॉवेल १२) वॉटर प्रुफ टेप आणि लेबल १३) कॅमेराव्हीडीओ कॅमेरा इ.

अशी हि साहित्य नेहमी व्यवस्थित स्वरुपात असावी व त्याची नेहमी देखभाल व्हावी.

आपत्ती व्यवस्थापन व ग्रंथापालांची भूमिका :

आपत्ती व्यवस्थापनात ग्रंथपालाची भूमिका सर्वात महत्वाची असते. त्यासाठी ग्रंथपालांनी पुढील संभाव्य धोके विचारात घेऊन त्यासाठी आधीच उपाययोजना करून ठेवणे जरुरीचे / गरजेचे आहेत - जसे

१) केंद्रशासनाने २००५ मध्ये आपत्ती व्यवस्थापन कायदा पारित केला आहे. त्याची माहिती करून घेणे.

२) विभागस्तारावरील आपत्ती व्यवस्थापन प्रधीकराणाकडून मार्गदर्शन घेणे.

३) आपत्ती व्यवस्थापनाची समिती नेमून त्यामध्ये भविष्यात येणाऱ्या आपत्तीपासून उपाययोजनांचा अभ्यास करणे तसेच आपत्तीच्या येणाऱ्या सर्व टप्प्यामध्ये त्याच्या जबाबदाऱ्या नमूद करणे.

४) विविध कार्यशाळा आयोजित करणे.

५) विविध पथनाट्य, जाहिरात फलक, भित्तीचीत्रद्वारे जनजागृती करणे.

६) ग्रंथपालांनी वेगवेगळ्या संस्था व संघटना यांच्याशी सतत संपर्क ठेवला पाहिजे.

७) ग्रंथालयातील वाचनसाहित्य, फर्निचर, इमारत, उपकरणे, संगणक यांचा विमा उतरवून ठेवणे.

८) ग्रंथालयातील उपकरणांची वेळोवेळी त्या त्या नियंत्रकाकडून तपासणी करून घेणे.

९) अग्निशामक यंत्रे तपासली जावीत.

आपत्ती व्यवस्थापनात घ्यावयाची काळजी:-

१) ग्रंथालयाची इमारत ही भूकंप प्रतिरोधक इमारत हवी. तसेच ग्रंथालयात आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास त्यातून बाहेर पडण्यासाठी शीघ्र जाण्याचा मार्ग उपलब्ध असला पाहिजे.

२) ग्रंथालय सुरु व बंद होण्याच्या वेळी सुरक्षारक्षक कडून तपासणी करणे. त्यासाठीसुरक्षारक्षक नेमणे.

IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
IJARSCT
Impact Factor: 6.252
Volume 2, Issue 1, September 2022

३) प्रशिक्षित कर्मचार्यांना त्याबद्दलचे प्रशिक्षण उपलब्ध करून देणे.

४) पुस्तक ठेवण्याची पद्धत, वाळवी व किड प्रतिबंधक उपाय योजणे.

५) आधुनिक सुरक्षा यंत्रणा (इलेक्ट्रोनिक्स) सिंगल स्वीच कंट्रोल सिस्टीम बसवून घेणे.

६) फायर अलार्म सिस्टीम, waterbell आऊट सिस्टीम बसविणे.

७) डीजीटायझेशन हे एक साहित्य जपण्याचे महत्वाचे साधन आहे. त्यासाठी वाचनसाहित्य संग्रह डिजिटल स्वरुपात संग्रहित करून सुरक्षित ठेवणे.

८) वेगवेगळ्या प्रकारचे रुंद जिणे, आवाज व प्रदूषण याबाबत तज्ञ व्यक्तींकडून सल्ला घेणे.

<u>कोरोना सारखी आपत्ती संपूर्ण देशावर आलेली असताना त्यात सुद्धा ग्रंथालय व ग्रंथपालाची भूमिका ही अतिशय महत्त्वाची कार्ये पार पाडत होती. ती पुढीलप्रमाणे-</u>

१) इंटरनेटमुळे माहिती घेणे सोपे घाले आहे पण ती माहिती अधिकृत आहे की नाही त्याची सत्यतापडताळून पाहण्यात ग्रंथपालाची भूमिका महत्वाची असते. व ती त्याप्रमाणे विद्यार्थी, शिक्षक, संशोधक यांना पुरविणे.

२) ओपन सोर्स असणारी पुस्तके, जर्नल्स, डिक्शनरी, न्यूजपेपर यांची माहिती वाचकांना पुरविणे.

३) इंटरनेटवरील विनामुल्य व विस्तारित दिल्या जाणाऱ्या सेवा व सुविधा पुरविणे इ.

<u>आपत्कालीन विभागात काम करणाऱ्या संस्था-</u>

१) फेडरल ईमर्जन्सी मॅनेजमेंट एजन्सी (FEMA)

२) Lyrasis Disaster Assistance

३) Northeast Document Conservation Center NEOCC) Emergency Assistance

४) American Institute for Conservation

५) National Institute of Disaster management

६) India Disaster Resource Network (IDRN)

७) PCI

८) SAARC Disaster Management Center

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

IJARSCT
Impact Factor: 6.252

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Volume 2, Issue 1, September 2022

**निष्कर्ष :**

थोडक्यातअसे म्हणता येईल की,आपत्ती हि कोणतीही असो नैसर्गिक अथवा मानवनिर्मित त्यामुळे प्रचंड नुकसान होते. ग्रंथालय हि वर्धिष्णू संस्था आहेत त्यात वाचन साहित्य, वाचक यांची संख्या हि सतत वाढत असते. अश्या या बहुमुल्य संपत्तीचे आपत्तीमुळे नुकसान होऊ नये यासाठी आपत्तीपूर्व अंदाज घेऊन आपत्ती व्यवस्थापनाचे नियोजन करणे गरजेचे असते.

**संदर्भसूची :**

१) https://instapdf.in/apatti_vyavasthapan/2019

२) https://inmarathi.net/apatti_vyavasthapan_information-in-marathi-pdf/2018

३) https://marathistudy.blogspot.com/2018/10/blogpost.html

४) Varma, Sarita (2018), Measures for Disaster in Libraries

५) डॉ. बोडके प्रकाश : ग्रंथालये व आपत्ती व्यवस्थापन, ज्ञानगंगोत्री नोव्हेंबर २०१०, अं.क्र.२ (P. 43)